‘‘मुंबई महानगरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ऐतिहासीक कार्य’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे शाखेतील इतिहास विषयाच्या

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर

करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

। संशोधक ।

प्रा.सुनिल आत्माराम धापसे

शंकर नारायण महाविद्यालय, नवघर

भाईंदर (पुर्व), ठाणे

। मार्गदर्शक ।

प्रा.डॉ. बोचरे जे. एम

सहयोगी प्राध्यापक

संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख

इतिहास विभाग

स्वर्गीय नितीन महाविद्यालय, पाथरी, जि.परभणी.

''मुंबई महानगरातील डॉ. बाबासाहेब आंबडकरांचे ऐतिहासीक कार्य''

प्रस्ताविक -

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मुंबईचे स्थान अनन्यसाधारण तर आहेच, पण त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय स्वांतत्र्याच्या लढ्यामध्ये आणि स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या राजकारणात आणि समाजकारणात महत्वपूर्ण योगदान देणारी अनेक नवरत्ने आपल्या या महानगरीने जोपासली, पुढे आणली आणि देशाला प्रदान केली आहेत. त्यातील एक अमोल रत्न म्हणजे प्रज्ञासुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर.

डॉ.आंबेडकराचे जन्म जरी मध्यप्रदेशात महु या ठिकाणी झाला असला तरी त्यांचे मुळ गाव रत्नागिरी जिल्हयातील अंबावडे हे महाराष्ट्रातील मुंबई जवळील होते. ते नऊ-दहा वर्षाचे असतांना त्यांच्या कुटूंबाने मुंबईला स्थलांतर केले.

बाबासाहेबांचे मुंबईतील बालपण लोअरपरळच्या बदक चाळीत गेले. मराठा हायस्कुल मध्ये काही महिने शिक्षण घेतल्यानंतर त्यांना धोबी तलाव जवळच्या एलफिन्स्टन हायस्कुलमध्ये दाखल करण्यात आले. पूर्वी गावाच्या बंदिस्त वातावरणात जाणवलेले जातीव्यवस्थेचे दाहक चटके मुंबईसारख्या महानगरीमध्ये अनुभवावे लागणार नाहीत अशी बाबासाहेबांची समजुत होती परंतु ती खरी ठरली नाही.

१९१५ साली मॅट्रिक झाल्यावर बाबासाहेब मंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयात दाखल झाले. महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच त्यांचे लग्न करुन देण्यात आले. लग्नाचा हॉल होता मुंबईचे भायखळ मार्केट त्यानंतर आंबेडकर कुटूंबियांनी परळ येथील 'बॉम्बे इम्प्रूव्हमेंट ट्रस्टच्या' (बी.आय.टी.) चाळीत स्थलांतर केले. तिथे रहात असतानांच १९१२ साली बाबासाहेब बी.ए. झाले. पुढे १९३४ साली दादरच्या हिंदु कॉलनी मध्ये स्वतःचे राजगृह हे निवास्थान बांधुन होईपर्यंत बाबासाहेबांच्या कुटूंबियाचे वास्तव्य तिथेच होते. १९१३ साली बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांच्या मदतीने बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना झाले. अमेरिकेतील कोलंबीया विद्यापीठातून एम. ए. आणि पीएच.डी. या पदव्या प्राप्त करुन नंतर लंडनला गेले. येथे 'डॉक्टर ऑफ सायन्स' आणि 'बार-ॲट-लॉचा' अभ्यास करीत असताना १९१७ साली बडोदा सरकारची झालेल्या करारापोटी त्यांनी बडोद्याला काही महिने नोकरी केली पण तिथेही जात आडवी आली आणि अवहेलना पत्करुन बाबासाहेब पुन्हा मंबईत दाखल झाले.

त्या पडत्या काळात बाबासाहेबांना आपल्या कुटुंबियाचा चरितार्थ तर चालवायचा होताच पण त्याशिवाय इंग्लंडला जाऊन आपले उर्वरित शिक्षण पूर्ण करण्यासाठी अर्थार्जन करायच होते. त्यासाठी त्यांनी मुंबईच्या शेअर बाजारातील सटोडियांना सल्ला देणारी एक कंपनी काढली, पण त्यांची जात कळल्यानंतर ती लवकर बंद पडली मग त्यांनी काही शिकवण्या केल्या पुढे नोव्हेंबर १९१९ मध्ये त्यांना मुंबईच्या सिडनेहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून हंगामी नोकरी मिळाली. थोडीशी बचत, काही कर्ज आणि कोल्हपूरच्या शाहु महाराजांची मदत यांच्या सहाय्याने

बाबासाहेब सप्टेंबर १९२० मध्ये पुन्हा इंग्लडला गेले आणि डॉक्टर ऑफ सायन्स आणि बॅरिस्टरची पदवी मिळवून एप्रिल १९२३ मध्ये मुंबईला परतले.

व्यक्तिविकासाच्या या पायाभूत कालखंडानंतर डॉ.आंबेडकरांनी शिक्षण, कायदा, पत्रकारिता, कामगार चळवळ, समाजकारण, राजकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रांमध्ये भरारी घेऊन त्यामध्ये मोलाची भर घातली.

हे सर्व कार्य अखिल भारतीय स्तरावर महत्वपूर्ण असले तरी या महान कामगिरीमध्ये मुंबई महानगरी डॉ. आंबेडकरांची कर्मभूमी मानून स्वतः चे असे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले.

माझ्या या शोध प्रबंधात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मुंबई महानगरीतील ऐतीहासिक कार्याचा आढावा घेणे हा शोध प्रबंधाचा मुख्य विषय असुन त्यादृष्टीने मुंबईत डॉ.बाबासाहेब जे जे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक कार्य केले ते संशोधनाव्दारे प्रकाशातआणण्याचा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवणावर व त्यांच्या कार्यावर देशात व देशाबाहेर सुध्दा अनेक संशोधकांनी प्रबंध सादर केलेले आहेत. परंतु मंबई महानगरातील बाबासाहेबांचे फार मोठे योगदान आहे व ते प्रकाशात येणे आवश्यक आहे. त्यांचे येथील योगदान लोकांसमोर आणण्याचा माझ्या शोध प्रबंधाचा उद्देश आहे. त्यासाठी बाबासाहेबांनी लिहिलेल्या ग्रंथाचा अभ्यास करणे. डॉ.बाबासाहेबांच्या काळातील व्यक्ती त्यांना प्रत्यक्ष भेटने त्याचप्रमाणे बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दल आणि बौध्द महासभेच्या कार्यालयात भेटी देणे. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर व कार्यावर उपलब्ध असणारी सर्व ऐतिहासीक मराठी, हिंदी व इंग्रजी साधनाचा / ग्रंथाचा अभ्यास करुन मुंबई महानगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या कार्याचा महत्वपुर्ण शोधप्रबंध पूर्ण करण्याची माझी इच्छा आहे. हिंदी व इंग्रजी साधनाचा / ग्रंथाचा अभ्यास करुन मुंबई महानगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या कार्याचा महत्वपुर्ण शोधप्रबंध पूर्ण करण्याची माझी इच्छा आहे.

विषयाचे महत्व :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर ज्येष्ठ व कनिष्ठ संशोधकांनी संशोधनात्मक मोलाची कामगिरी केली आहे. त्यात प्रामुख्याने य.दी.फडके, हरी नरके, वसंत मून, खोब्रागडे, भालचंद फडके, शंकरराव खरात इत्यादी मान्यवरांनी सखोल असे संशोधन केले आहे. परंतु मुंबई महानगरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर मनावे तेवढे किंवा सखोल व्यापक स्वरूपाचे संशोधन झालेले नाही. मुंबईतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची अज्ञात असलेली माहिती प्रकाशित करुन आजच्या पिढीस ही मार्गदर्शक ठरणार आहे.

विषय निवडीचा उद्देश -

मुंबई महानगरीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे ऐतिहासीक कार्य या इतिहास विषयातील शोधप्रबंध सादर करण्याचा उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) मुंबई महानगर म्हटल्यास फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, नाना शंकरशेट ह्यांची नावे घेतली जातात पण त्याचप्रमाणे बाबासाहेबांचे कार्य सुध्दा फार महत्वाचे आहेत हे माझ्या शोध निबंधातुन मांडणे.

२) डॉ. बाबासाहेबांना दलीतांचा नेता म्हणुन संबोधले जाते परंतु मुंबई महानगरीत ते सर्वसामान्य जनतेचे, कामगाराचे नेते होते त्यांच्या संशोधनाव्दारे उलगडा करणे.

३) संयुक्त महाराष्ट्र चळवळीला डॉ.बाबासोबांचा पाठींबा होता. मुंबई महाराष्ट्रालाच मिळाली पाहिजे ही त्यांची उघड भुमिका हेती. त्याचा ही संशोधनातुन उलगडा करणे.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आंदोलने, राजकीय आंदोलने, कामगार, चळवळी, धार्मिक चळवळी, पत्रकरीता ह्या सर्वांचे केंद्र मुंबई महानगरीच होते हे संशोधनातुन सिध्द करणे.

५) दलित जनतेला विशेषतः कोकणातील महार लोकांना एकत्र करण्यासाठी, त्यांच्यात धार्मिक व सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांनी बौध्द पंचायतीची स्थापना केली. ह्या पंचायती फक्त मुंबई, कोकणातच दिसुन येतात, त्यांचा पध्दतशीर अभ्यास करणे.

६) मुंबई महानगरीच्या जडणघडणीत बाबासाहेबांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. ते संशोधनात मांडणे.

गृहितके :-

१) डॉ.बाबासाहेबांच्या कर्तृत्वात मुंबई महानगरीचे योगदान मोठे होते.

२) मुंबई महानगरीत सर्वसामान्यजनतेला शिक्षणाचे द्वार उघडुन देण्याच कार्य केले.

३) अखील भारतीय स्तरावर राष्ट्रीय प्रवाहात महत्वपुर्ण योगदान देत असताना आपली कर्मभूमी म्हणुन डॉ.आंबेडकरांनी मुंबई महानगरीवर मनस्वी प्रेम केले.

४) डॉ.आंबेडकरांनी आपल्या धकाधकीच्या जीवनक्रमातुन सवड काढुन ते मुंबईमहानगरीचे जनजीवन समृध्द करण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहिले.

५) मुंबईतील सर्व प्रमुख संस्थांना डॉ.आंबेडकरांचा स्पर्श झालेला दिसुन येतो.

संशोधन पध्दती :-

मुंबई महानगरीतील डॉ.बाबासाहेबांचे कार्य या विषयाच्या संशोधनासाठी प्रामुख्याने संदर्भ संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे.

संशोधन विषयाच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजगृहातील ग्रंथालय, मुंबई विद्यापीठाचे जवाहरलाल नेहरु ग्रंथालय, मुंबईतले मराठी पत्रकार संघाचे ग्रंथालय, सिडनेहम महाविद्यालयातील कागदपत्रे, शासकीय

लॉ महाविघालय (मुंबई) तील ग्रंथालय, सिम्बॉयसीसडीम्ड विद्यापीठाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्युझीयम, (पुणे) एशियाटीक ग्रंथालय (मुंबई) महाराष्ट्र शासनाचे शासकीय मुद्राणालयातील पुस्तके तसेच वेगवेगळ्या संस्थानातून रिसर्च मासिकांच्या शोध निबंधाचा आढावा घेऊनशास्त्रीय संदर्भ संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे.

प्रस्तुत संशोधन विषय संदर्भ संशोधन पध्दतीचा असला तरी पारदर्शक व सखोल विस्तारित संशोधन व्हावे म्हणुन विषयाच्या अनुषंगाने आवश्यकता भासेल त्या ठिकाणी ज्येष्ठ संशोधकांच्या मुलाखती सुध्दा घेण्यात येणार आहेत.

शिवाय विषयाच्या अनुषंगाने मुंबई महानगरातील डॉ.बाबासाहेबांचा संबंध आलेल्याविविध स्थळांना भेटी देणे, बाबासाहेबाच्या कुटुंबातील व्यक्तिच्यामुलाखती घेण्यात येणार आहेत. या माध्यमातुन मिळालेल्या माहितीच्या आधारे संशोधनाची मांडणी केली जाईल.

संशोधनाच्या मर्यादा :-

१. काळाच्या पडद्याआड गेलेले दुर्मिळ साधने

२. शोध प्रबंध वेळेत पुर्ण करावयाचा असल्याने आर्थिक आणि शारिरीक मर्यादा

प्रकरण पहिले

मुंबई महानगरीचा संक्षिप्त इतिहास

मुंबईला मुंबई हे नाव मुंबादेवीच्या नावावरुन पडले आहे. मुंबई हे नाव दोन शब्द मिळूनबनले आहे. मुंबा म्हणजे महा-आंबा, आणि देवी म्हणजे आई. सर्व प्रथम पोर्तुगीजाने या बंदराबरोबर आपले संबंध आल्यानंतर या बंदराला ज्या वेगवेळ्या नावाने संबोधले आहे ती नावे अशी आहेत. बेनजनम्बु, तेज-माझ्याम्बु,माईयाम्बु नंतर या नावात बदल झाला व नंतर शेवटी पोर्तुगीजाने 'बोय बाहीय' असे नाव निश्चित केले. याची माहिती अेटायमोलॉनी अथवा ओलोमॅकस्टिक्स पोर्तुगील शब्दकोषात आहे. यावरुन असे सिध्द होते की, बॉम्बे हे नावपोर्तुगाल शब्दावरुन आले आहे . नंतर १९९५ मध्ये बॉम्बेचे नाव परत मुळ नावावरुन मुंबई करण्यात आले.

आजची मुंबई ही कुलाबा फोर्ट, भायखळा, परेल, वरळी, मांटुगा, माहिम या बेटांनी बनलेली होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या प्रखर विरोधानंतर, लढ्यानंतर १०५ हुतात्म्याच्या बलीदानानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व मुंबईला महाराष्ट्राची राजधानी बनवले गेले.

मुंबईची प्राचीन ऐतिहासीक पार्श्वभूमी, :-

मुंबईची प्राचीन ऐतिहासीक पार्श्वभूमी समजुन घेत असताना आपणास इ.स. पुर्व २५० या कालखंडाचा विचार करावा लागेला. कारण या कालखंडात मुंबई बेटावरमानवी वस्ती असल्याचे पुरावे सापडले आहेत. प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत मुंबईवर अनेक राज्यकर्त्यांनी व अनेक सत्तांनी राज्य केले त्यांच्या या सत्ता प्रणालीतुनच आपणास मुंबईच्या ऐतिहासीक पार्श्वभुमीची माहिती मिळते.

मुंबईची मध्ययुगीन ऐतिहासीक पार्श्वभूमी,:-

मुंबईची मध्ययुगिन ऐतिहासीक पार्श्वभूमी जाणुन घेत असताना सर्वप्रथम आपणास परकीय सत्तांचा विचार करावा लागेल. सर्वप्रथम पोर्तुगीजांनी गुजरातच्या सुलतान बहादुरशहकडून वसई प्रांत मिळविला. नंतर पोर्तुगीजांनी गुजरातच्या सुलतानाकडून ठाणे, तारापूर, बांद्रा, माहिम, मुंबई बेट काबीज केले. म्हणजेच मुंबईवर मध्ययुगीन कालखंडात सर्वप्रथम परकीय सत्ताधीशांची सत्ता होती. तारापूर, बांद्रा, महिम, मुंबई बेट काबीज केले. म्हणजेच मुंबईवर मध्ययुगीन कालखंडात सर्वप्रथम पोर्तुगीज या परकीय सत्ताधीशांची सत्ता होती.

पुढे हेच बेट पोर्तुगीज राजाने आपली कन्या कॅथेरीन बॅगाझा हिला आंदण म्हणुन दिले.कॅथरिन बॅगाझाच्या विवाह इंग्लडंचा राजा दुसरा चार्लस यांच्याबरोबर ठरला होता. आणि त्यानुसारच इ.स.१६६५ मध्ये मुंबई बेट पोर्तुगीजांनी इंग्रजांच्या स्वाधीन केले.बहादुरशहा, पोर्तुगीज व इंग्रज अशा तीन सत्ताधिशांचा संबंध या कलखंडात आला होता असे स्पष्ट होते.

मुंबईची आधुनिक ऐतिहासीक पार्श्वभूमीः

मुंबई हे बेट ब्रिटिशांना आंदन मिळाल्यानंतर ब्रिटिशांचे ईस्ट इंडीया कंपनीला १० पौंड या नाममात्र भाड्याने दिले. त्यामुळेच अप्रत्यक्ष रुपाने मुंबईवर कंपनीची सत्ता प्रस्थापित झाली. मुंबई व सभोवतालच्या प्रदेशावर कंपनीचे वर्चस्व वाढत गेले. काँग्रेस स्थापनेचे ठिकाण या नात्याने मुंबईची ऐतिहासीक पार्श्वभूमी महत्वाची मानली गेली आहेत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने जे छोडो भारत आंदोलन महात्मा गांधाजींच्या नेतृत्वाखाली सुरु केले होते त्यांचा आरंभ मुंबईतुन झाला होता. पुढे हेआंदोलन संपूर्ण भारतभर पसरले. या सर्व ऐतिहासीक पार्श्वभुमीचा सविस्तर अभ्यास करुन शोध प्रबंधात मांडण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे

डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे जीवनचरित्र

जातीभेद व अस्पृश्यता यांच्या घणाघाती आघात करुन सर्व जीवन अस्पृश्ययोध्दारासाठी वाहीलेला महान नेता म्हणजेच डॉ.भीमराव उर्फ बाबासाहेब आंबेडकर (इ.स.१८९१-१९५६)अस्पृश्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि अस्पृश्य लोकात सामाजीक व राजकीय जागृती करण्यासाठी, 'मुकनायक', 'जनता', 'समता व प्रबुध्द भारत' अशी अनेक वृत्तपत्रे बाबासाहेबांनी काढली. सन १९२४ साली त्यांनीअस्पृश्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, 'बहिष्कृत हितकारणी ही संघटना निर्माण केली. इतर हिंदुप्रमाणे अस्पृश्यांनाही समाजात समतेचे हक्क मिळाले पाहिजेत, या मागणीसाठी बाबासाहेबांनी इ.स.१९२७ साली महाड येथे'चवदार तळयाचा सत्यागृह आणि १९३० साली नाशिक येथे राम मंदिर प्रवेशाचा सत्यागृह अशी दोन प्रखर आंदोलने करुन अस्पृश्य समाजात मोठी सामाजिक जागृती घडवुन आणली.

पुढे सन १९३०-३३ दरम्यान इंग्लंड मध्ये भरलेल्या गोलमेज परिषदेत बाबासाहेब अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणुन उपस्थित राहिले. त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. गांधीजींच्या प्रखर विरोधानंतर स्वतंत्र मतदार संघ मान्य न करता राखीव मतदार संघ मान्य न करता राखीव मतदार संघ ठेवण्यात आले. सन १९४२ ते १९४६ काळात हे गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते.

सन १९४२ साली देशातील सर्व अस्पृश्यांना संघटीत करण्यासाठी बाबासाहेबांनी'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' नावाचा राजकीय पक्ष स्थापन केला. शिक्षणाच्या क्षेत्रात अस्पृश्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणुन 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली आणि तिच्याद्वारे मुंबईत 'सिध्दार्थ कॉलेज'व औरंगाबादेत 'मिलिंद कॉलेज' या नामवंत संस्थाची स्थापना केली. स्वतंत्र भारताची घटना बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली तयार केली गेली. हिंदु धर्मात परिवर्तन होणे अशक्य आहे, याची जाणिव झाल्यानंतर त्यांनी आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौध्द धर्माचा स्विकार केला. एक महान समाज सुधारक, दलितांचा नेता, कायदे पंडित, समाज शास्त्रज्ञ, थोर विचारवंत व भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणुन आधुनिक भारताच्या इतिहासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अढळ आहे. हे प्रस्तुत प्रकरणात अभ्यासण्यात येणार आहे.यासाठी विविध लेखकांच्या लिखानातुन साकारलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याजीवन चरित्राचे सखोल अध्ययन करणार आहे.

प्रकरण तिसरे

शिक्षण क्षेत्रातील कार्य

मुंबई महानगरीतील डॉ. आंबेडकरांनी साध्या शिकवणी पासून प्राध्यापकापर्यंत व पिपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापनेपर्यंतचा आढावा ह्या प्रकरणामध्ये संशोधनात्मक पध्दतीने घेतला जाईल. मुंबईच्या सिडनेहॅम्प महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक, गव्हर्मेंट लॉ कॉलेजचे प्राध्यापक व प्राचार्य पदावर केलेल्या कार्याचा सखोल अभ्यास येथे करणार आहे.

पूढे १९४६ मध्ये त्यांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेची स्थापना करुन मुंबईत सिध्दार्थ महाविद्यालयाची उभारणी केली. साध्या शिकवण्यापासून सुरु झालेला डॉ. बाबासाहेबांचा सिध्दार्थ महाविद्यालय उभारणी पर्यंतचा प्रवासमाझ्या शोधप्रबंधामध्ये आढावा घेणे. सिध्दार्थ महाविद्यालयाने प्रा.मधु दंडवते, प्रा.अनंत काणेकर यासारखे उत्कृष्ट प्राध्यापक तर मुंबईच्या विद्यार्थ्यांना दिलेच पण मुंबईचे पहिले 'मॉर्निंग कॉलेज' सुरु करण्याचा मान सिध्दार्थ महाविद्यालयाचाच. Earn and Learn *(मिळवा आणि शिका) या उपक्रमातुन अनेक गरीब व होतकरु विद्यार्थ्यांचे शिक्षण पुर्ण करणारे महाविद्यालय सुध्दा सिध्दार्थच. त्यांच्या शिक्षण कार्याचा शोधप्रबंधातुन आढावा घेण्यात येईल.*

प्रकरण चौथे

सामजिक आंदोलने

पद दलितांच्या उध्दारासाठी डॉ.आंबेडकरांनी जी सामाजिक आंदोलने उभी केली. त्यांची सुरुवात झाली ती मुंबईत मार्च १९२४ मध्ये परळच्या दामोदर हॉलमध्ये सभा घेऊन 'बहिष्कृत हितकारणी सभा' या संस्थेची रुपरेषा ठरविण्यात आली. जुलै १९२४ मध्ये स्थापन झालेल्या या सामाजिक संस्थेचे कार्यालय दामोदर हॉलमध्येच होते. डॉ.बाबासाहेबांचे स्वतःचे कार्यालय त्यांच्या बी.आय.टी. चाळीतील राहात्या घराजवळच सोशल सर्व्हिसलीगच्या इमारतीच्या एका छोट्या खोलीत थाटण्यात आले होते. सन १९२७ साली महाडच्या चवदार तळे सत्ययाग्रळाच्या आणि सन १९३० साली नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या पूर्वतयारीच्या बैठका त्याच कार्यालयात घेण्यात आल्या होत्या. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक आंदोलने महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेर केले होते. त्यांचे आंदोलनाची तयारी मुंबईतुनच केली जात असे. मुंबईतील आंदोलनाचा आढावा दुर्मिळ कागदपत्राद्वारे अभ्यासपूर्ण मांडण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

कामगार चळवळ

डॉ.आंबेडकर प्रणीत कामगार चळवळीची सुरुवात झाली तीच मुळी बॉम्बे म्युनिसिपल कामगार संघाचे अध्यक्ष म्हणुन १९३४ साली. डॉ.आंबेडकरांनी सन १९२४ ते १९३४ पर्यंत चाललेल्या विविध कामगार संपाचा विरोध केला. त्यावेळी भारतातील कामगार चळवळीवर डाव्यापक्षाचे वर्चस्व होते. डॉ.आंबेडकरांच्या मते हे सर्व संप राजकीय हेतुंनी प्रेरित होते. म्हणुन त्यांनी संपाला प्रखर विरोध केला. सन १९२९ मध्ये तर गिरणी कामगार संघाविरुध्द त्यांनी प्रति-प्रचार मोहीम उघडली. आणि २९ एप्रिल १९२९ रोजी परळच्या दामोदर हॉलमध्ये एक मोठी सभा घेऊन कामगारांना संपापासुन परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. अशा विविध संपातुन, सभातुन डॉ.आंबेडकरांना कामगार नेते म्हणुन मान्यता मिळाली. ह्या सर्व घटनांचा सविस्तर अभ्यास करुन शोध प्रबंधामध्ये मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

प्रकरण सहावे

राजकीय आंदोलने

त्यावेळच्या मुंबई प्रातांच्या विविधमंडळाचे सदस्य म्हणुन डॉ. आंबेडकरांची नियुक्ती झाली. ती सन १९२६ साली विविधमंडळात त्यांनी शोषित पीडित जनसामान्यांच्या दुःखाला वाचा फोडली. १९२८ साली आणि नंतर सन १९३७ साली त्यांनी महार वतने नष्ट करण्यासाठीचे विधेयक मांडले.

राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या संदर्भात गांधी -आंबेडकर वाद निर्माण झाल्यानंतर महात्मा गांधीजीनी डॉ.आंबेडकरांची पहिली ऐतिहासीक भेट झाली ती मुंबईत, मणी भुवन येथे (१४ ऑगस्ट १९३१) सन १९३७ साली डॉ.आंबेडकरांनी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. त्या पक्षाचे मुख्य कार्यालय मुंबईतच होते.

सन १९३७ साली पहिली सार्वत्रिक निवडणुक झाली. त्यात स्वतंत्र मजूर पक्षाने राखीव जागासाठी १५ उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ११ निवडून आले. स्वतः डॉ.आंबेडकर मुंबई शहरातील भायखळा - परळ भागातुन प्रचंड बहुमताने निवडुनआले त्या यशाचा सोहळासंपन्न झाला तो देखील मुंबईच्या कामगार मैदानात.

त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी १९ जुलै १९२४ रोजी 'शेडयुल्ड कास्ट फेडरेशन' ची स्थापना केली आणि त्या माध्यमातुन राजकीय आंदोलने चालु ठेवली. त्या सर्वांचा केंद्रबिंदु अर्थात मुंबई महानगरी हाच होता. डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय आंदोलनाचे केंद्र सुध्दा मुंबईच राहीले आहे. त्यांचा दुर्मिळ कागदपत्रांच्या आधारे शोध प्रबंधात मांडणी करण्याचा माझा प्रयत्न राहील.

प्रकरण सातवे

पत्रकारिता

सामाजिक राजकीय आंदोलन चालवण्यासाठी प्रभावी मुखपत्राची गरज वादातील असते. डॉ.आंबेडकरांनी 'मुकनायक' 'बहिष्कृत भारत' आणि 'जनता' ही पक्षीके चालवली. या सर्व पक्षीकांचे कार्यालय आणि मुद्रणस्थळ अर्थात मुंबईतच होते. या पक्षिकांव्दारे डॉ.आंबेडकरांच्या सामाजिक-राजकीय आंदोलनाला पाठबळ तर मिळालेच. पण त्याशिवाय मराठी भाषेवरच्या त्यांच्या असामान्य प्रभुत्वाची ओळख पटली. डॉ.बाबासाहेबांनी सुरु केलेले वृत्तमानपत्रे जास्त काळापर्यंत चालली नाही, परंतु वर्तमानपत्राव्दारे त्यांनी समाजातील वाईट चालीरितीवर प्रखर लिखाण केले. त्याच प्रमाणे ब्रिटिशांच्या धोरणावर सुध्दा कडाडुन टिका केली. एवढे असुन सुध्दा भारतातील ज्येष्ठ पत्रकारात बाबासाहेबांचे नाव घेतले जात नाही. मुंबईतील वृर्तमाणपत्रामध्ये बाबासाहेबांच्या पाक्षीक व वृर्तमानपत्राचा पाहिजे तसा उल्लेख केला जात नाही. तो उल्लेख झाला पाहिजे त्या दृष्टीन शोध प्रबंधात सविस्तर मांडण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्रकरण आठवे

निष्कर्ष

वरील सात प्रकरणातील संशोधनाअंती मिळालेल्या महितीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात येईल. मी माझ्या प्रबंधाची मांडणी वरील प्रकरणात करणार आहे तथापि, हा केवळ संशोधनाचा आराखडा आहे,संशोधनाच्या दरम्यान साधनांच्या उपलब्धतेनुसार संशोधन आराखड्यात बदल हेऊ शकतो.

संदर्भ ग्रंथ सुची

१) कठारे अनिल :- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८-१९६०)

२) पाटील व्ही.बी. :- महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास

३) एम.डी.डेव्हीड :- ऐक मुंबई तूझी कहाणी

४) न.रा. फाटक :- मुंबई नगरी

५) यशवंत रायकर :-मुंबई ज्ञात व अज्ञात

६) M.D.David :- Bombay the city of Drams

७) द.न.गोखले :- डॉ.आंबेडकराचे अंतरंग

८) नानक चंद स्तू :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी

९) नागोराव कुंभार :- डॉ.आंबेडकरविचार दर्शन

१०) य.दि.फडके :- डॉ.आंबेडकरांचे मारेकरी अरुण शोरी

११) डॉ.विजया खंडाळे - इंगोले :- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारीता : एक समाजशास्त्रीय विश्लेषण

१२) चांगदेव भवानराव खैरमोडे :- डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड १ ते १२ सुगावा प्रकाशन पुणे.

१३) राजा जाधव :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्य चळवळ

१४) आचार्य प्र.के.अत्रे :- दलितांचे बाबा

१५) वि.र.काळे :- धम्मचक्रप्रवर्तक ज्ञानयोगी- डॉ.बाबासाहेब आंबेडकर

१६) श्याम तागडे :- बोधिसत्व आंबेडकरांची धम्मसंकल्पना- विपर्यास आणि वास्तव

१७) डॉ.वा.ना.कुबेर :- डॉ.आंबेडकर विचारमंथन

१८) प्रभाकर वैद्य :- डॉ.आंबेडकर आणि त्यांचा धम्म

१९) डी.वाय.हाडेकर :- डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान

२०) नितीश विश्वास :- राष्ट्रनेने डॉ.बी.आर.आंबेडकर

२१) विजय सुरवाडे :- डॉ.आंबेडकरांची निवडक भाषणे

२२) शेषराव मोरे :- डॉ.आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास

२३) अरुण कांबळे :- जनता पत्रातील :- लेख - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

२४) भालचंद्र फडके :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर

२५) भास्कर लक्ष्मण भोळे :- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारीक वारसा

२६) केशव मेश्राम :-:- डॉ.बाबासाहेब आंबेडकर चिंतन

२७) नामदेव ढसाळ :- आंबेडकरी चळवळ आणि सोशालिस्ट कम्युनिष्ट

२८) महाराष्ट्र शासन :- डॉ.बी.आर.आंबेडकरांची लेखन व भाषणे खंड ३ व ५

२९) S.K. Pandagale - Life, Ideas and thought of .BR Ambedkar Vol. II

30) Christophe Jaffrelot Dr Ambedkar and Untouchability

31) S.K. Shukla :- Dr.BR Ambedkar (Buddhism and Dalt Perspectived)

32) M.L.Ranga - Dr. B.R. Ambedkar Life, work and relevance

33) Sanjay Prakash Sharma - Dr BR Ambedkar A Crusder of Social Justice

34) Verinder Grover :- Bhimrao Ramji AmbedkarA Biography of his vision and ideas

35) S.P.Sharma :- Ambedkar and socio - Political Revival in India

36) AK. Narain, D.C.Ahir :- Dr. Ambedkar, Buddhism and social change

37) D.R. Jatava :- Sociological Though of B.R. Ambedkar

38) Sheshro Chavan :- Gandhi and Ambedkar Saviours of Untouchables

39) M.S. Gore :- The social context of an Ideology Ambedkar's political and social Thought

40) Velerian Rodrgiues :- The Essential writings of B.R. Ambedkar

संशोधक

प्रा.सुनिल आत्माराम धापसे

शंकर नारायण महाविद्यालय, नवघर

भाईंदर (पुर्व), ठाणे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. बोचरे जे. एम

सहयोगी प्राध्यापक

संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख

इतिहास विभाग

स्वर्गीय नितीन महाविद्यालय,

पाथरी, जि.परभणी.